**पाहिजेत**
**सार्वमंथन न्युज महाराष्ट्र चॅनेलसाठी**
अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यासह प्रत्येक तालुक्यात
**न्युज रिपोर्टर व कॅमेरामन**
जागा भरणे आहे. आकर्षक पगारासह इतर सुविधा दिल्या जातील. इच्छुकांनी खालील क्रमांकावर संपर्क करावा.
**दै. सार्व मंथन कार्यालय,**
शिव चिंदबर कार्यालयाजवळ, बारागाव नांदुर रोड, राहुरी, जि. अहिल्यानगर. मो. 9822544072

सायं. दैनिक
# सार्व मंथन
नवी दिशा, नवी आशा
मुख्य संपादक : अनिल कोळसे, मो. ९८२२५४४०७२
इंटरनेट आवृत्ती : गुगल वर पहा www.sarvmanthan.in

**आता लाडक्या बाळाच्या वाढदिवसाची जाहिरात**


- अधिक माहितीसाठी आजच संपर्क करा -
9822544072
9370948911
* नियम व अटी लागू.

। अहिल्यानगर । वर्ष ५ वे । अंक २०८ वा । मंगळवार, १० मार्च २०२६ । पाने ४ । किंमत ३ रुपये । RNI No. MAH/MAR/2016/72596 । sarvmanthan16@gmail.com ।

## ‘व्हीएसआर’चे अंडरवर्ल्डशी संबंध?

**मुंबई**
सार्व मंथन । वृत्तसंस्था

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अमोल मिटकरी यांनी दिवंगत नेते अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणावरून गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी व्हीएसआर कंपनीचे मालक व्ही. के. सिंग यांच्यावर पिंकी माळी यांच्या कुटुंबीयांना धमकावल्याचा आरोप केला. व्ही. के. सिंग यांनी पिंकी माळी यांच्या भावाला माध्यमांसमोर येऊ नका, अशी धमकी दिली आहे. त्यांनी वापरलेली भाषा अंडरवर्ल्डशी संबंधित लोक वापरतात, अशी शंका वाटते. त्यामुळे व्ही. के. सिंग यांचे अंडरवर्ल्डशी काही संबंध आहेत का, याची चौकशी झाली पाहिजे, असे मिटकरी म्हणाले.

▶ अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणावर मिटकरींचा आरोप
▶ विमान अपघातावर सभागृहात चर्चा ▶ राजकारणात चर्चेला उधाण



मिटकरी यांनी सांगितले की, त्यांनी स्वतः पिंकी माळी यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. या भेटीत व्हीएसआर कंपनीने या कुटुंबाला कोणतीही मदत केलेली नसल्याचे समोर आले. या कुटुंबाला कोणताही आधार देण्यात आलेला नाही, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे, असे त्यांनी नमूद केले. त्याचवेळी त्यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले. पिंकी माळी यांच्या आईच्या उपचारासाठी दोन डॉक्टरांची नियुक्ती केल्याबद्दल त्यांनी शिंदेंचे कौतुक केले. तसेच या संपूर्ण कुटुंबाला पोलिस संरक्षण देण्यात यावे आणि उपचारांचा सर्व खर्च सरकारने उचलावा, अशी मागणीही त्यांनी केली.दरम्यान, अजित पवार विमान दुर्घटनेच्या तपासाबाबतही मिटकरी यांनी नाराजी व्यक्त केली. या घटनेवर चर्चा सातत्याने पुढे ढकलली जात असल्याचे त्यांनी म्हटले. आज या विषयावर चर्चा होईल असे सांगितले होते, मात्र तो अजेंड्यातच नाही. त्यामुळे या प्रकरणात विलंब का केला जात आहे, असा प्रश्न निर्माण होतो, असे त्यांनी सांगितले. या दुर्घटनेबाबत अद्याप पोलिसांकडून एफआयआरही नोंदवण्यात आलेली नाही, हेही त्यांनी अधोरेखित केले.

मिटकरी यांनी पुढे सांगितले की, या संपूर्ण प्रकरणावर विरोधक नक्कीच आवाज उठवतील. अजित पवारांच्या विमान अपघाताचा मुद्दा गंभीर आहे आणि यावर सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. विरोधक हा विषय सभागृहात उपस्थित करतील आणि मी स्वतःही या चर्चेत सहभागी होणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. या घटनेमुळे राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना सुरुवात झाली असून तपासाची दिशा काय असेल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## महाराष्ट्रात कारखाने बंद होण्याच्या मार्गावर

**मुंबई**
सार्व मंथन । वृत्तसंस्था

मध्यपूर्वेतील अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाचे परिणाम आता महाराष्ट्रात स्पष्टपणे दिसू लागले आहेत. या युद्धामुळे गॅस पुरवठा साखळी विस्कळीत झाली असून एलपीजी आणि एलएनजी गॅसचा तुटवडा निर्माण होऊ लागला आहे. या परिस्थितीचा परिणाम उद्योग, हॉटेल व्यवसाय आणि सामान्य नागरिकांवर एकाच वेळी होताना दिसत आहे. काही ठिकाणी उद्योग बंद होण्याच्या मार्गावर आहेत, तर शहरांमध्ये गॅस सिलिंडरसाठी नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. त्यामुळे राज्यात गॅस टंचाईचे संकट अधिक गडद होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये एलएनजी गॅसच्या कमतरतेचा सर्वाधिक फटका उद्योगांना बसताना दिसत आहे. औद्योगिक वसाहतींमध्ये सुमारे ३० कारखाने बंद पडण्याच्या मार्गावर असल्याची माहिती समोर येत आहे. विशेषतः ऑटोमोबाईल, फार्मा आणि स्टील उद्योगावर या तुटवड्याचा मोठा परिणाम झाला आहे. सध्या अनेक उद्योगांकडे केवळ दोन दिवस पुरेल एवढाच गॅस साठा उरला आहे. केंद्र सरकारने या वायूचा वापर केवळ घरगुती एलपीजी उत्पादनासाठी राखीव ठेवल्याने औद्योगिक गॅस पुरवठा थांबला आहे. त्यामुळे उत्पादन प्रक्रियेवर थेट परिणाम झाला असून अनेक कारखान्यांना कामकाज कमी करावे लागले आहे.

संभाजीनगरमधील शेंद्रा, वाळूज आणि चिखलठाणा या औद्योगिक भागांमध्ये गॅस तुटवड्याची परिस्थिती अधिक तीव्र झाली आहे.

## पोलिस तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

### पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**अहिल्यानगर**
सार्व मंथन । प्रतिनिधी

पोलिस दलात ठाणे येथे कार्यरत असलेल्या एका २६ वर्षीय तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून, तिला लग्नाचे आमिष दाखवत तसेच तिचे खाजगी फोटो व व्हिडीओ सोशल मिडीयावर प्रसारित करण्याची धमकी देऊन नगर दौंड रोडवरील एका लॉजमध्ये वारंवार अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

या प्रकरणी आरोपी रणजित मुकिंदा चव्हाण (वय २७, रा. निमजेवाडी, घोटवी, ता.श्रीगोंदा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पिडीत तरुणीने फिर्याद दिली आहे. फिर्यादी तरुणीही मुळची नगर जिल्ह्यातील आहे. आरोपी रणजित चव्हाण याने पीडित तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात ओढत तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर मार्च २०१९ पासून ते फेब्रुवारी २०२६ या प्रदीर्घ कालावधीत त्याने पीडितेचे खाजगी फोटो व व्हिडीओ काढून ते सोशल मिडीयावर प्रसारित करण्याची भीती दाखवली. याच धमकावणीचा गैरफायदा घेत, आरोपीने वारंवार तरुणीच्या इच्छेविरुद्ध शारीरिक संबंध ठेवले व तिला नगर दौंड रोडवरील बाबुर्डी बेंद शिवारातील एका लॉजवर नेवून अत्याचार केला.

त्याच्या वारंवारच्या धमक्यांना आणि अश्लील भाषेत करण्यात येणाऱ्या शिवीगाळीला कंटाळून अखेर पीडित तरुणीने ८ मार्च रोजी नगर तालुका पोलीस ठाण्यात धाव घेऊन सर्व प्रकार पोलिसांना सांगितला.

पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी रणजित मुकिंदा चव्हाण याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५१ (२), ३५२, ६४(१), ६४(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलीस उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे पुढील तपास करत आहेत.

### सावित्री माय

सावित्रीबाई फुलेंचे
सुचरित्र चित्ता कर्षक
संघर्षमयी रेआयुष्य
विचार हृदयस्पर्शक

ब्राह्मण विधवा मूल
स्वता घेतले दत्तक
मुले आपली मानली
सारे अनाथ बालक

शिक्षीत केले सस्नेहे
गुणांची होई पालक
शेणराडे चिखल फेके
श्रुढ समाज मालक

पहिली महिलाशाळा
निर्मीले सार्थ शिक्षक
घडवती खरा माणूस
माई समाज समीक्षक

संस्था जनकल्याणा
समाज सत्य शोधक
वेशांना दिलाआश्रय
ती सन्मान मार्गदर्शक

भ्रृण हत्या थांबवली
सतिप्रथेची विरोधक
विधवा पुनर्विवाहात
दृष्टी सुधारणा शोधक

भुरळ घाले काळाला
गुण माईंचे संमोहक
स्त्रवते मायेचे निर्झर
जरी झाले छठसतक

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

## तनपुरेंच्या संभाव्य भाजप प्रवेशामुळे अक्षय कर्डिले मुंबईत ‘फिल्डिंग’वर

**राहुरी**
सार्व मंथन । विशेष प्रतिनिधी



राहुरी विधानसभा मतदारसंघातील स्व. आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी लवकरच पोटनिवडणूक जाहीर होण्याची शक्यता आहे. निवडणुकीची घोषणा येत्या आठवड्यात होण्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू असून या पार्श्वभूमीवर मतदारसंघात राजकीय हालचालींना चांगलाच वेग आला आहे.

या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाकडून स्व. शिवाजीराव कर्डिले यांचे सुपुत्र अक्षय कर्डिले हे उमेदवारीसाठी प्रबळ दावेदार मानले जात आहेत. दिवंगत आमदार कर्डिले यांचा मतदारसंघात असलेला प्रभाव आणि सहानुभूतीची लाट लक्षात घेता भाजपकडून कर्डिले कुटुंबालाच संधी दिली जाईल, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे.

मात्र दुसरीकडे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या संभाव्य भाजप प्रवेशाच्या चर्चेला अचानक उधाण आले आहे. तनपुरे भाजपमध्ये प्रवेश करून राहुरी पोटनिवडणूक लढवू शकतात, अशी चर्चा काही दिवसांपासून सुरू असून त्यामुळे कर्डिले समर्थकांमध्ये नाराजीचे वातावरण असल्याचे बोलले जात आहे. भाजपचे कट्टर कार्यकर्ते आणि कर्डिले गटातील पदाधिकारी तनपुरे यांच्या संभाव्य प्रवेशाबाबत नाराजी व्यक्त करत असल्याचीही चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

दरम्यान, उमेदवारीसाठी पक्षश्रेष्ठींकडे पाठपुरावा करण्यासाठी अक्षय कर्डिले यांनी हालचाली वाढवल्या आहेत. काल त्यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांची भेट घेतल्याची माहिती समोर आली होती. या भेटीत राहुरी पोटनिवडणुकीसंदर्भात चर्चा झाल्याचे समजते.

त्यानंतर आज अक्षय कर्डिले यांनी मुंबई गाठून भाजपचे प्रदेशाध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतल्याचे कळते. या भेटीत पोटनिवडणुकीसाठी भाजपची उमेदवारी मिळावी यासाठी कर्डिले यांनी पक्ष नेतृत्वाकडे आपली भूमिका मांडल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे कर्डिले यांनी उमेदवारीसाठी ‘फिल्डिंग’ लावल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

दरम्यान, तनपुरे यांच्या भाजप प्रवेशाबाबत अद्याप अधिकृत घोषणा झालेली नसली तरी आगामी पोटनिवडणुकीत भाजप कोणाला उमेदवारी देते आणि तनपुरे यांच्या राजकीय भूमिकेबाबत पुढे काय निर्णय होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अहिल्यानगर जिल्हा परिषदेकडून २० गुरुजींवर होणार कारवाई

**अहिल्यानगर**
सार्व मंथन । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील तब्बल पंधरा ते वीसजणांचे दिव्यंगत्त्व बनावट असल्याचे समोर आले आहे. शरीराने धडधाकट असतानाही त्या गुरुजींना दिव्यांग असल्याचा बनावट प्रमाणपत्राडरे घाट घातला होता.

त्या गुरुजींना निलंबित करण्याच्या हालचाली सुरू आहेत. दोन दिवसांत त्यांच्यावर ही कारवाई होऊ शकते. जिल्हा परिषद त्यांचे केवळ निलंबन करणार की गुन्हे दाखल करणार, हे औत्सुक्याचे आहे.

काही कर्मचाऱ्यांनी बनावट दिव्यांग प्रमाणपत्राच्या जोरावर नोकरीचा लाभ घेतला आहे. काहींनी केवळ बदलीसाठी हे प्रमाणपत्र दाखवल्याचे दिसते. शून्य ते २० टक्के दिव्यंगत्त्व आढळलेल्या कर्मचाऱ्यांना नोटिसा पाठवल्या होत्या. त्या नोटिसांना त्यांनी उत्तर दिले आहे. ते खुलासे तपासले जात आहेत.

सिव्हिल हॉस्पिटलने केलेल्या कागदपत्र तपासणीत त्यांचा हा दिव्यंगत्त्वाचा बनाव उघडकीस आला होता. त्यानंतर संबंधित शिक्षकांना नोटिसा बजावल्या होत्या. काहींचे दिव्यंगत्वाचे प्रमाण शून्य असल्याचे समोर आले.

ग्रामविकास विभागाच्या निर्णयानुसार जिल्हा परिषदेच्या दिव्यांग कर्मचाऱ्यांची फेर वैद्यकीय तपासणी पान २ वर

## १८ जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा इशारा

**पुणे**
सार्व मंथन । वृत्तसंस्था

राज्यात उष्ण लहरी जोरदार सक्रिय झाल्या असून, कमाल तापमान ३८ ते ४० अंशांवर पोहचले आहे. त्यामुळे १८ जिल्ह्यांना आगामी दोन दिवस उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात उष्ण लहरी सक्रिय होत आहेत. यंदाच्या हंगामातील पहिली उष्णतेची लाट रविवारपासून सुरू झाली आहे.

काही भागांत मंगळवार, बुधवारपर्यंत ती सक्रिय राहणार आहे. विदर्भातील अमरावती, अकोला या दोन जिल्ह्यांत ही लाट १८ मार्चपर्यंत सक्रिय राहील.. पालघर, ठाणे, मुंबई, धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, लातूर, अकोला, अमरावती, वर्धा या भागात उष्ण लाटांचा इशारा दिला आहे.

## राहुरी पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग

### कर्डिले समर्थकांची धाकधूक, तनपुरेंच्या भाजप प्रवेशाच्या चर्चांना उधाण



**अनिल कोळसे**
मो. ९८२२५४४०७२

राहुरी – नगर – पाथर्डी विधानसभा मतदारसंघाचे आमदार स्व. शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या जागेसाठी येत्या दहा ते पंधरा दिवसात निवडणुकीचा कार्यक्रम लागून पोटनिवडणूक होण्याची शक्यता आहे.

येत्या काही दिवसांत या निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, या पार्श्वभूमीवर मतदारसंघातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे.

स्व. आ. शिवाजीराव कर्डिले यांचे सुपुत्र व युवा नेते अक्षय कर्डिले यांनाच भारतीय जनता पक्षाने उमेदवारी देऊन पोटनिवडणूक लढविण्याची संधी द्यावी, अशी मागणी भाजप समर्थक व कर्डिले समर्थकांकडून जोर धरू लागली आहे. स्व. कर्डिले यांनी दीर्घकाळ मतदारसंघात केलेल्या कार्याची परंपरा कायम ठेवण्यासाठी अक्षय कर्डिले यांनाच संधी देणे योग्य ठरेल, असा सूर समर्थकांमध्ये उमटत असताना मात्र दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे हे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चांनी राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. भाजपकडून तनपुरे यांना राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीची उमेदवारी देण्याबाबतही चर्चा रंगू लागली आहे. त्याचवेळी अक्षय कर्डिले यांना विधान परिषदेत संधी देण्याचा पर्याय पक्षांतर्गत चर्चेत असल्याचे बोलले जात आहे.

या चर्चांमुळे कर्डिले समर्थक व स्थानिक भाजप कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण होऊन राहुरी येथे झालेल्या बैठकीत कर्डिले समर्थकांनी एकमुखाने अक्षय कर्डिले यांनाच उमेदवारी देण्याची मागणी केली. अन्यथा सामूहिक राजीनामे देण्याचा इशाराही काही कार्यकर्त्यांनी दिल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी काही दिवसांपूर्वी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याची माहिती समोर आली आहे. तसेच अलीकडेच गुहा येथे झालेल्या कानिफनाथ महाराज यात्रोत्सवातील महाआरती कार्यक्रमात बोलताना त्यांनी राज्यातील सरकार हे आपल्या विचारांचे असल्याचे सांगत सध्या सत्तेत २४० आमदार असून आमच्यातीलही काही १० आमदार सत्तेत सहभागी होण्याच्या तयारीत असल्याचे विधान केले होते.

या वक्तव्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षातील काही आमदार सत्तेत सहभागी होणार असल्याच्या चर्चांना पुन्हा जोर मिळाला आहे. त्यातच तनपुरे यांना भाजपकडून राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी मिळू शकते, अशी चर्चा अधिक रंगू लागली आहे.

विधानसभेच्या पार्श्वभूमीवर माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या भाजप प्रवेश यामुळे कर्डिले समर्थकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

मात्र तनपुरे यांच्या संभाव्य भाजप प्रवेशाला कर्डिले समर्थकांसह काही भाजप कार्यकर्त्यांकडून विरोध होत असल्याचे दिसून येत आहे. याच पार्श्वभूमीवर भाजप कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळाने लोणी येथे जाऊन जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेतली. या भेटीत तनपुरे यांना भाजपमध्ये प्रवेश देऊ नये तसेच राहुरी पोटनिवडणुकीसाठी अक्षय कर्डिले यांनाच उमेदवारी द्यावी, अशी मागणी करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.

दरम्यान, राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीची घोषणा लवकरच होण्याची शक्यता असल्याने पुढील काही दिवसांत राजकीय समीकरणे अधिक वेगाने बदलण्याची चिन्हे आहेत. तनपुरे भाजपमध्ये प्रवेश करून निवडणूक लढवतात की भाजपकडून अक्षय कर्डिले यांनाच उमेदवारी दिली जाते, याकडे मतदारसंघासह संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. दरम्यान, प्राजक्त तनपुरे यांच्या पक्ष बदलाच्या हालचाली सुरू असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात जोर धरत आहे.

### तनपुरे यांच्या भाजप प्रवेशाने कर्डिलेंच्या कार्यकर्त्यांची धाकधूक!

एकीकडे तनपुरे यांच्या भाजपात प्रवेशाच्या चर्चा सुरू असताना तर दुसरीकडे कर्डिले यांची चिंता वाढली आहे. तर कर्डिले समर्थकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. तर कुठल्याही प्रकारे भाजप आम्हाला डावलणार नाही अशी कर्डिले कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे तर वरिष्ठ पातळीवर तनपुरे यांना भाजपमध्ये प्रवेश मिळाला तर मात्र स्थानिक नेते व कार्यकर्त्यांची गोची होणार आहे हे मात्र नक्की.

### ...तर इतरही पक्ष व संघटनेचे उमेदवार निवडणूक लढवतील!

राहुरी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तनपुरे कर्डिले यांच्यात लढत न होता हि निवडणूक बिनविरोध होणार यामध्ये अक्षय कर्डिले माघारी घेणार कि पुढील राजकीय गणित जुळवण्यासाठी तनपुरे थांबून घेणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. मात्र तनपुरे–कर्डिले यांपैकी इतरही पक्ष व संघटना उमेदवारीच्या रिंगणात उतरतील, हे मात्र काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे.





## संपादकीय...

मो. ९८२२५४४०७२

# अमेरिका मित्र की शत्रू?

सध्या मध्यपूर्वेत युद्ध सुरू असून केव्हा जागतिक तिसरे महायुद्ध सुरू होईल? सांगता येत नाही. यामध्ये जागतिक वर्चस्व टिकून राहावे म्हणून अमेरिकेचे आटोकाट प्रयत्न चालू आहेत. याला खरे तर अमेरिकेची गुंडगिरी हाच शब्द योग्य ठरू शकतो. जगाची सर्व सूत्रे आपल्या हातात असावी व सगळ्यांनी, जगांनी आपल्या इशाऱ्यावर नाचले पाहिजे असे अमेरिकेला वाटते आणि जे कोणी ऐकणार नाहीत ते शत्रू समजून दंड केला जाईल किंवा संपवले जातील अशी अमेरिकेची भूमिका आहे. मुळात अमेरिकन वसाहतवाद, साम्राज्यवाद निर्माण करताना अमेरिकेतील लाखो रेड इंडियन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मूळच्या लोकांची हत्या कत्तल करून अमेरिका निर्माण झाली आहे आणि त्यांनी जगाला शांततेचे धडे किंवा संदेश द्यावेत असा हा विरोधाभास नाही का? या ठिकाणी दोन मांजरातील भांडणात माकडाने मध्यस्थी करून लोण्याचा गोळा स्वतः खाण्याचा प्रयत्न ही गोष्ट बरोबर लागू पडते. आपल्याला शाळेत इतिहासात मोहम्मद तुघलग या बादशहाचे गोष्टीत लहरी मोहम्मद याचे वर्णन केले आहे, मला तर अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे रूपाने लहरी मोहम्मद याची सुधारित आवृत्ती दिसून येते, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. अमेरिकेची गुंडगिरीची वास्तवता समजून घेताना थोडे पाठीमागे जाऊन पाहावे लागेल. संपूर्ण जगाचा कच्चा क्रूड तेलाचा साठा मध्यपूर्वेत योगायोगाने बहुतांश राष्ट्र ही मुस्लिम आहेत, या सगळ्याकडून कच्चे तेल कवडीमोल किमतीने घेऊन त्याचे शुद्धीकरण रिफायनरीमधून करून जगाला पुरवठा करण्याचे होल अँड सोल एजन्सी अमेरिकेकडे होती. मोनोपोली म्हणावी लागेल. तरीदेखील विहिरीतून प्रचंड तेल निघत असल्याने अरब राष्ट्रे श्रीमंत झाली. अमेरिकेच्या वर्चस्वाला प्रथम धक्का बसला व धोका वाटला तो इराकच्या सद्दाम हुसेन यांच्या अरब राष्ट्राना एकत्र करून स्वतः रिफायनरी करण्याच्या भूमिकेमुळे. मग काय अमेरिकेचे धाबे दणाणले. त्यांनी मग इराक कडे केमिकल हत्यारे आहेत असे आवई उठवून सद्दाम हुसेन यांना षडयंत्र ने व गुंडगिरीने संपविले. इराकमध्ये सापडले तर काहीच नाही. पण जगामध्ये अमेरिकेच्या विरोधात कोणीही बोलायचे धाडस केले नाही. त्या वेळच्या लेखात सद्दाम हुसेन यांची आपण बऱ्यापैकी पाठराखण केली आहे. तर लादेन हा अतिरेकी असल्याने त्याचा मात्र निषेध केला आहे. या समजून घेण्याच्या गोष्टी आहेत. इराणचे भारताचे संबंध चांगले असल्याने तेल खरेदी सतत चालू होती. अमेरिकेचा दबाव वगैरे या सगळ्या गोष्टी खोट्या आहेत. उलट चीन आणि रशियाबरोबर भारताला देखील इराण ने समुद्रधुनी वापरण्यासाठी परवानगी दिली असल्याने अमेरिकेला वाईट वाटले होते. शत्रूचा शत्रु तो आपला मित्र या भूमिकेमुळे अमेरिका इजराइलची पाठ राखण करीत आहे. इराण युद्धाची तयारी म्हणून अनेक वर्षापासून मिसाईल तयार करीत आहे. फक्त त्याची मारा करण्याची अंतराची क्षमता कमी असल्याने अमेरिकेचे साधले आहे. खोमेनेइ यांच्या हत्येनंतर इराणला राग येणे स्वभाविक आहे. म्हणून मग त्यांनी मध्यपूर्वेतील सर्व अमेरिकन दूतावासावरती हल्ले सुरू केले. तथापि बरोबर टारगेटेड मारा करणारी अद्ययावत टेक्नॉलॉजी कमी असल्याने मुस्लिम राष्ट्रावर कुठेही मारा झाला आहे आणि एकच गडबड झाली. सौदी अरब, यु ए इ, कुवेत, कतार, ओमान इत्यादी देशांमध्ये शिक्षण आणि नोकरी निमित्ताने सुमारे एक कोटी भारतीय लोक आहेत. त्यांना सुखरूप सोडवून मायदेशी आणणे हे खूप मोठे भारतासमोरचे आव्हानात्मक काम आहे. तर भारतातले विरोधासाठी विरोध करणाऱ्या लोकांनी लगेच खोमेनी यांच्या हत्येनंतर लगेच दुःख का व्यक्त केले नाही म्हणून ओरडायला सुरुवात केली. वास्तविक इराणच्या दूतावासात जाऊन आपल्या प्रतिनिधींनी शोकसंदेश लिहिलेला आहेच. पण तो यांना पाहायचा नाही. खोमेनी यांची हत्या झाली हे वाईट झाले, पण त्यांचे चारित्र्य काही फारसे चांगले नसल्याने इराणमधील महिलांनी रस्त्यावर उतरून जल्लोष केला. तर भारतात मात्र इथल्या खोमेनी समर्थकांनी मोर्चे काढले. खरे तर इथंल्या अल्पसंख्य बांधवांची गोची झाली आहे. कारण खोमेनी पण आणि जल्लोष करणारी जनता पण एकाच धर्माचे आहेत. मग नक्की बाजू कोणाची घ्यायची?इथे मात्र भारत सरकारच्या विरोधात मोर्चे निघत आहेत, हे दुर्दैवी आहे, हे अभिव्यक्ती स्वातंत्र्य फक्त भारतातच आहे. आता या ठिकाणी भारतीय अल्पसंख्य बांधवांची पंचायत झाली आहे. इराणची बाजू घ्यायची? अफगाणिस्तानची घ्यायची? की पाकिस्तानची घ्यायची? त्यामुळे द्विधा मनस्थिती निर्माण झाली आहे. म्हणून मग सोपा मार्ग म्हणून भारत सरकारचे विरोधात मोर्चे काढायचे. फ्रान्समध्ये प्रेषित मोहम्मद साहेब यांचे कार्टून काढले किंवा सलमान रशदी यांनी लंडनमध्ये पुस्तक छापले या गोष्टीशी भारतीय जनतेचा काय संबंध? मग इथे मोर्चे काढून भारतीय जनतेला वेठीला धरण्यात काय अर्थ आहे? यु ए इ, सौदी, बहरीन, कतार, कुवेत, जॉर्डन येथे कोणीही मिरवणूक सुद्धा काढू शकत नाही. वास्तविक ही सगळी राष्ट्र एकाच धर्माची आहेत.याबाबतीत भारतातच फक्त खरी लोकशाही व अभिव्यक्ती स्वातंत्र्य असल्याने कोणीही काहीही बोलणे कितपत योग्य आहे?जगामध्ये कोणत्याही राष्ट्रापेक्षा भारतातील अल्पसंख्याक बांधव हा सुरक्षित आहे कारण तो इथे हिंदूच्या बरोबर राहात आहे. ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही, असे वाटते. या बांधवांनी अफजल गुरु यांच्या ऐवजी भारतरत्न अब्दुल कलाम यांचा आदर्श समोर ठेवला तर निम्मे प्रश्न लगेच सुटतील. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अशी परिस्थिती निर्माण होण्यासाठी अमेरिकाच नकळत का होईना जबाबदार आहे. त्यामुळे आता जनतेनेच ठरवावे अमेरिका ही मित्र आहे की शत्रू?

# बचत गटांच्या उत्पादनांना आता हक्काची बाजारपेठ

## पाथर्डीत लवकरच साकारणार उमेद मॉल : आ. राजळे

**पाथर्डी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

बचत गट चळवळीमुळे घराघरातील महिलांमध्ये आर्थिक साक्षरता निर्माण होऊन त्यांची निर्णय घेण्याची क्षमता विकसित झाली आहे. या बचत गटांच्या उत्पादित मालाला हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी शासन स्तरावर 'उमेद मॉल' हा उपक्रम तालुका निहाय राबवण्याचा निर्णय घेण्यात आला असून, पाथर्डी तालुक्यातही हा उपक्रम लवकरच सुरू होणार असल्याची माहिती आमदार मोनिका राजळे यांनी दिली.

जागतिक महिला दिनानिमित्त गोरे मंगल कार्यालयात राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत बचत गटांना निधी वितरण आणि बांधकाम कामगारांना साहित्य व भांडी वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नगराध्यक्ष अभय आव्हाड, ज्येष्ठ नेते अशोक चोरमले, उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, भाजप महिला आघाडी अध्यक्ष काशिताई गोल्हार, शहराध्यक्ष ज्योती शर्मा, सामाजिक कार्यकर्त्या मनीषा घुले, गटविकास अधिकारी संगीता पालवे, सहाय्यक कामगार आयुक्त रेवणनाथ भिसले, उद्योजक नितीन एडके यांसह विविध नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी आ. राजळे म्हणाल्या, कष्टकरी वर्गाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाने अनेक कल्याणकारी योजना हाती घेतल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार व एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी केलेले प्रयत्न यशस्वी ठरत आहेत. महिलांना स्वयंपूर्ण करणारी लाडकी बहीण योजना कदापि बंद केली जाणार नाही, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. तसेच कामगार ओळखपत्रांचे नूतनीकरण व इतर सेवा सुलभ होण्यासाठी आमदार कार्यालयात



मार्गदर्शन केंद्र सुरू केल्याचेही त्यांनी नमूद केले.

बचत गटांची ताकद राज्याला औद्योगिक स्वप्न साकारण्याकडे घेऊन जात असून, महिलांनी महिला विकास दूत म्हणून शासकीय योजना घराघरात पोहोचवाव्यात, असे आवाहन त्यांनी केले. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनीही अर्थसंकल्पात महिलांसाठी भरीव तरतूद केल्याने महिलांचे भवितव्य उज्ज्वल असल्याचे राजळे यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रेवणनाथ भिसले यांनी केले, सूत्रसंचालन राजीव सुरवसे यांनी तर आभार संदीप फुंदे यांनी मानले. यावेळी आमदार राजळे यांच्या हस्ते बचत गटांना धनादेश व कामगारांना साहित्याचे वाटप करण्यात आले.

# श्रीरामपुरात गावठी कट्टा विक्रीचा डाव फसला

## पोलिसांची छापा; कट्टा-कत्तीसह आरोपी जेरबंद

**श्रीरामपूर**
सार्व मंथन । प्रतिनिधी

श्रीरामपूर शहरात गावठी कट्टा विक्रीसाठी फिरणाऱ्या एका संशयिताला शहर पोलिसांनी सापळा रचून अटक केली. आरोपीकडून एक गावठी कट्टा व लोखंडी कत्ती असा एकूण ३५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे शहरातील अवैध शस्त्र व्यवहार उघडकीस आला आहे.

पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार नवी दिल्ली, वॉर्ड क्रमांक २ परिसरात इम्रान उस्मान पठाण (वय ३१) हा गावठी कट्टा विक्रीसाठी फिरत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार देशमुख यांच्या आदेशावरून पोलिसांचे पथक तात्काळ घटनास्थळी रवाना झाले.

पोलीस पथकाने परिसरात सापळा रचून संशयित व्यक्तीला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे एक गावठी कट्टा व लोखंडी कत्ती आढळून आली. चौकशीदरम्यान हा कट्टा विक्रीसाठी आणल्याची कबुली आरोपीने दिल्याने पोलिसांनी त्याला अटक करून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे व उपविभागीय पोलीस अधिकारी



जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपास पथकात पोलीस उपनिरीक्षक रोशन निकम यांच्यासह अमोल पडोळे, संभाजी खरात, मच्छिंद्र कातखडे, सचिन दुकळे, अमोल गायकवाड, रामेश्वर तारडे, सागर बनसोडे, रविंद्र शिंदे व अजित पटारे यांनी सहभाग घेतला.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रोशन निकम हे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करत आहेत.

# गणेशवाडी येथे तिथीप्रमाणे शिवजयंती साजरी

**घोडेगाव**
सार्व मंथन । प्रतिनिधी

नेवासा तालुक्यातील गणेशवाडी येथे तिथीप्रमाणे दि. ६ रोजी शिवजयंती साजरी करण्यात आली.

यावेळी गावातील ५० ते ६० तरुणांनी गड किल्ले शिवनेरी येथुन पायी ज्योत आणली होती.ज्योत आणण्यासाठी जाणाऱ्या तरुणांना माजी मंत्री शंकरराव गडाख यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या. जिल्हा परिषदेचे सुनील गडाख तसेच सोनई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच पायी ज्योत आणलेल्या तरुणांचा सन्मान देखील या वेळी करण्यात आला. सायंकाळी ७ ते ९ शिवचरित्रकार नितीन महाराज भोसले यांच्या सुमधुर वाणीतून किर्तन सोहळा पार पडला. तदनंतर महाप्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# तनपुरे कुटुंबियांकडून सामान्य कार्यकर्त्यांना न्याय देण्याची भूमिका : सुखदेव बिलाल

**राहुरी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

राहुरी शहर व तालुक्यातील सर्वसामान्य कार्यकर्त्यांना माजी खासदार प्रसादराव तनपुरे व कुटुंबियांकडून नेहम ीच न्याय देण्याची भूमिका घेतली जाते असे प्रतिपादन राष्ट्रीय मानवाधिकार सुधार संघटनेचे(दिल्ली) कार्यकारणी सदस्य सुखदेव बिवाल यांनी केले.

राहुरी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी भाऊसाहेब मोरे सर यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा राष्ट्रीय म ानवाधिकार सुधार संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला प्रसंगी सुखदेव बिवाल बोलत होते. बिवाल पुढे म्हणाले की, राहुरीचे तनपुरे कुटुंबीयांकडून नेहमीच सर्वसामान्य, गोरगरीब कार्यकर्त्यांची पाठराखन केली जाते. शहर व तालुक्यातील लहान-मोठे संस्थावर सामान्य कार्यकर्त्यांची नियुक्ती केली जाते त्यामुळे आगामी विधानसभेच्या पोटनिवडणुकीत माजी मंत्री प्राजक्त दादा तनपुरे यांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन यावेळी सुखदेव बिवाल यांनी केले.

प्रसंगी नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे यांनी आपण माजी खासदार प्रसादराव तनपुरे, अरुण साहेब तनपुरे, डॉक्टर उषाताई तनपुरे, प्राजक दादा तनपुरे व युवा नेते हर्ष तनपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील रस्ते, स्वच्छता, पाणी प्रश्न, घरकुल योजना आदी कामे करून मिळालेल्या संधीचे सोने करणार असल्याचे स्पष्ट केले.

यावेळी सुखदेव बिवाल यांच्या हस्ते नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास



भीम आर्मीचे जिल्हाध्यक्ष तानसेन बिवाल, प्रवीण गायकवाड, संदीप सरोदे, लाला सय्यद, सुरज उपदे, राहुल जाधव, संतोष त्रिभुवन, गुलशन बिवाल, शिवम बिवाल, राजू शेख, निसार पठाण, पवन उमरवाल, शिवा साळवे आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून पान १ वरून

## २० गुरुजींवर होणार कारवाई

करण्यात आली होती. जिल्हा परिषदेच्या शिक्षण तसेच आरोग्य, कृषी, वित्त, ग्रामपंचायत आदी विभागांतील कर्मचाऱ्यांचे दिव्यंगत्त्व बनावट असल्याचे उघडकीस आले.जिल्हा परिषदेतील काही शिक्षकांनी, तसेच इतर विभागांतील कर्मचाऱ्यांनी संवर्ग एकच्या बदलीसाठी स्वतः किंवा पत्नी व मुले दिव्यांग, मतिमंद अथवा मेंदूच्या आजाराने ग्रस्त असल्याबाबत प्रमाणपत्रे सादर केले होते. याव्यतिरिक्त या शिक्षकांनी तसेच अन्य कर्मचाऱ्यांनी कोणकोणता लाभ घेतला, याचीही पडताळणी झाली आहे.

दिव्यांग कर्मचारी नेहमीच वादाच्या भोवऱ्यात सापडले. आता त्यांचा हा बनाव उघडकीस आला आहे.काही दिव्यांग शिक्षकांनी तपासणीचा ससेमिरा चुकविण्यासाठी उच्च न्यायालयात धाव घेतल्याचे आरोप आहेत. त्यात काही संघटनांच्या नेत्यांचाही समावेश असल्याचे समजते. नाशिकच्या अहवालातील कारवाईबाबत दिरंगाई होत आहे.

जिल्हा परिषदेने तब्बल ३९० दिव्यांग कर्मचाऱ्यांचे रेकॉर्ड तपासणीसाठी जिल्हा रुग्णालयाकडे पाठवले होते.कोणत्याही कर्मचाऱ्याचे दिव्यंगत्त्वाचे प्रमाण ४० टक्क्यांवर असेल, तर दिव्यंगत्त्व मानले जाते. जिल्हा परिषदेने तपासणीसाठी पाठवलेल्या रेकॉर्डमध्ये शून्य ते २० टक्क्यांवर प्रमाण खाली आले आहे. याबाबत अधिकाऱ्यांनीही आश्चर्य व्यक्त केले आहे.

# गायींच्या वाहतुकीचा संशय

## दुचाकीस्वारास चिरडण्याचा प्रयत्न

**सोनई**
सार्व मंथन । प्रतिनिधी

नेवासा तालुक्यातील घोडेगाव शिवारातील मारमोडी पुलाजवळ रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास एक धक्कादायक घटना घडली. गायींची बेकायदेशीर वाहतूक होत असल्याचा संशय आल्याने एका आयशर टेम्पोचा पाठलाग करणाऱ्या दोन तरुणांच्या दुचाकीला टेम्पो चालकाने जाणीवपूर्वक धडक देत त्यांना ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली आहे. या घटनेत दोन्ही तरुण जखमी झाले असून त्यापैकी एकाची प्रकृती गंभीर असल्याचे समजते. या प्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात अज्ञात टेम्पो चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संकेत सोमनाथ हराळे (वय २८, रा. चांदा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. फिर्यादी संकेत हराळे व त्यांचा मित्र सार्थक केळगेंद्रे हे दोघे ८ मार्च रोजी रात्री सुमारे १ ते १.३० वाजण्याच्या दरम्यान त्यांच्या स्प्लेंडर मोटारसायकल (क्रमांक एमएच १७सिएस ७२७४) वरून घोडेगाव परिसरातून जात होते.

यावेळी त्यांना आयशर टेम्पो (क्रमांक जीजे २३एटी ९२७२) मध्ये गायींची वाहतूक होत असल्याचा संशय आला. त्यामुळे त्यांनी त्या टेम्पोचा पाठलाग केला. काही अंतरावर जाऊन त्यांनी टेम्पोला ओव्हरटेक करून पुढे जाण्याचा प्रयत्न केला. मात्र टेम्पोवरील अज्ञात चालकाने संतापाच्या भरात किंवा पकड टाळण्यासाठी जाणीवपूर्वक वेगाने टेम्पो चालवत त्यांच्या दुचाकीस्वाराला मागील बाजूने जोरदार धडक दिली.

या धडकेमुळे दुचाकीवरील दोघेही तरुण मोटारसायकलसह रस्त्याच्या कडेला फेकले गेले. या अपघातात फिर्यादी संकेत हराळे यांच्या चेहऱ्यावर व शरीराच्या इतर भागांवर गंभीर जखमा झाल्या. तर त्यांच्या मागे बसलेले मित्र सार्थक केळगेन्द्रे यांच्या दोन्ही पायांवर गंभीर मार बसल्याने तेही जखमी झाले. घटना घडल्यानंतर आयशर टेम्पो चालकाने थांबण्याऐवजी घटनास्थळावरून चांदा गावाच्या दिशेने वेगाने पळ काढला.

जखमींना तातडीने उपचारासाठी प्रथम स्थानिक ठिकाणी हलविण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना मॅक्सकेअर हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

या घटनेची माहिती मिळताच सोनई पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणी अज्ञात टेम्पो चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यात वापरलेले वाहन आयशर टेम्पो असल्याचे निष्पन्न झाले असून त्याचा शोध घेण्याचे काम पोलिसांनी सुरू केले आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सूरज मेढे करत आहेत. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, स्थानिक माहिती आणि वाहनाच्या क्रमांकाच्या आधारे आरोपीचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

**मुळव्याध, मुतखडा व भगंदर त्वचारोग आयुर्वेदिक औषधाने बरा**

मुळव्याध रक्त पडणे, कोंब, आग होणे, भगंदर, शौचास त्रास तसेच मुतखडाचे सर्व आजारावर-आयुर्वेदिक औषध मुतखडा (किडनी स्टोन) १ एमएम ते ४० एमएमचे-खडे औषधाने विरघळतात. पोट, कंबर, गुडघे दुखणे यावर आयुर्वेदिक रामबाण
औषध ऑपरेशनची गरज नाही, त्वचा रोग संबंधी सर्व औषध उपलब्ध आयुर्वेदिक बरे झालेले पेशंटचे व्हिडिओ पहायला मिळेल.
संपर्क-अशोकराव पालवे वांजुळपोई, ता. राहुरी मो. नं. ९३७०५०४७७६

(०६ डिसेंबर)

**राहुरीत गाळे भाडोत्री देणे आहे**

राहुरी मार्केट यार्ड मधील शेतकरी भवन मागे एक हॉल ४९ बाय ३४ व ११ बाय ३४ चे गाळे भाडोत्री देणे आहे. तरी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
संपर्क-९४०४५३९७०७, ९८८१७६०३२४

(०६ डिसेंबर)

फिक्स चान्स के लिए संपर्क करे
100% **कोहिनुर** Rs. 100/-
कल्याण राजधानी नाईट साप्ताहिक
साप्ताहिक Date : 09.03.26
कल्याण - राजधानी (डे/ना) मेन बाजार (ओपन) या (क्लोज) **मेन बाजार**
सोमवार ते शनिवार Date : 09.03.26

| | | | |
|---|---|---|---|
| 2 237 390 679 | 7 269 368 467 | 4 149 158 590 | 9 180 478 568 |
| 3 580 670 689 | 8 170 378 567 | 5 230 258 780 | 0 235 370 578 |
| 4 149 158 167 | 9 180 289 478 | 6 150 259 358 | 1 100 380 560 |
| 5 168 690 780 | 0 190 389 569 | 7 278 250 890 | 2 237 345 570 |
| 6 367 349 790 | 1 128 245 489 | 8 125 189 459 | 3 346 490 670 |
| 7 278 250 890 | 2 129 138 147 | 9 360 450 469 | 4 149 167 789 |

कायमचा मेंबरसाठी संपर्क साधा (अंकशास्त्रावर आधारित दुर उपयोग करु नये)

फिक्स चान्स के लिए संपर्क करे
100% **कोहिनुर** Rs. 100/-
कल्याण राजधानी नाईट साप्ताहिक
साप्ताहिक Date : 09.03.26
कल्याण राजधानी (डे/ना) मेन बाजार (ओपन) या (क्लोज) **मेन मुंबई**
100% Date Fix FREE GAME Open to Close

| सोमवार ते मंगळवार | बुधवार ते गुरुवार |
|---|---|
| 4 338 699 9 388 144 | 5 366 447 0 118 299 |
| 40 - 45 x 90 - 95 | 51- 56 X 01- 06 |

| शुक्रवार ते शनिवार | साप्ताहिक |
|---|---|
| 1 227 588 6 277 330 | 2 336 499 7 188 449 |
| 12 - 17 x 62 - 67 | 23 - 28 X 73 - 78 |

साप्ताहिक CP 56 X 45 67 X 34 12 X 23

विचार बदला नशीब बदलेल
संपर्क : 9970640587

# थोडक्यात

## किड्स किंग्डम अकॅडमीमध्ये संस्कार शिबिराचे आयोजन




सार्व मंथन ✍ घोडेगाव । पाश्चात्य शिक्षण पद्धती स्वीकारल्यानंतर आपल्या मुलांमध्ये हळूहळू भारतीय संस्कृतीचे विस्मरण होताना दिसत आहे. या बदलाचा थेट परिणाम कौटुंबिक नातेसंबंधांवर, सामाजिक बांधिलकीवर आणि एकूणच मूल्यव्यवस्थेवर होत आहे. आधुनिक शिक्षण आवश्यक असले तरी संस्कारांशिवाय ते अपुरे ठरते, ही जाणीव आज प्रकर्षाने जाणवत आहे. याच अनुषंगाने मुलांच्या मनात संस्कारांचे बीज रोवण्यासाठी पसायदान आनंदवन सेवाभावी संस्था एक सातत्यपूर्ण उपक्रम राबवत आहे. समाजाला सांस्कृतिक अधिष्ठान देणाऱ्या, अनुभवसंपन्न आणि मान्यवर व्यक्तींच्या मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी, किड्स किंगडम विद्यालयाच्या सहकार्याने केले जात आहे. मुलं कितीही उच्चशिक्षित झाली, कितीही यशस्वी झाली; पण जर ती संस्कारित नसतील, तर एक दिवस आपल्या सर्वांनाच पश्चात्तापाची वेळ येऊ शकते. आपली हजारो वर्षांची समृद्ध, सुसंस्कृत परंपरा जतन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. या संकल्पनेने आज किड्स किंगडम मध्ये डॉ.हेमा मॉ.राजेंद्रजी वैरागर यांनी व्याख्यान दिले. विद्यार्थ्यांना संस्काराचे महत्त्व पटवून दिले. कोणत्या गोष्टी कराव्या कोणत्या करू नये याबद्दल मार्गदर्शन केले.

## सोनई ग्रामपंचायतच्या वतीने पो.नि. कुसळकर यांचा सन्मान



सार्व मंथन ✍ सोनई । सोनई, ता. नेवासा येथील शिवनाथ कुसळकर गुरुजी यांचे चिरंजीव अविनाश कुसळकर यांची नुकतीच राज्य सेवेतून पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाली. यामुळे सोनई ग्रामपंचायतच्या वतीने अविनाश कुसळकर यांचा सन्मान ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी प्रशांत कदम, सदस्य अंबादास राऊत यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य भानाभाऊ कुसळकर, सखाराम राशीनकर, संतोष तेलोरे हे यावेळी उपस्थित होते. यावेळी अंबादास राऊत म्हणाले, सोनई परिसरात कुसळकर परिवार सुसंस्कृत व अतिशय कष्टाळू परिवार आहे. शिवनाथ कुसळकर गुरुजी यांचे चिरंजीव अविनाश यांनी अतिशय मेहनत घेऊन अभ्यास केला. याचे फळ त्यांना पोलीस उपनिरीक्षक ही पोस्ट मिळाली. यामुळे अविनाश कुसळकर हे सोनई गावातील तरुण पिढी साठी प्रेरणा निर्माण केली आहे.यावेळी ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत कदम यांनी कुसळकर यांचे कौतुक केले. तसेच सोनई गावातील तरुण पिढी साठी मार्गदर्शक म्हणून काम करावे असे कदम म्हणाले.

# जिल्ह्यात एलपीजी गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया; नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाला सहकार्य करावे

**अहिल्यानगर**
सार्व मंथन । प्रतिनिधी

जिल्ह्यात एलपीजी गॅसच्या पुरवठ्यामध्ये नागरिकांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील एलपीजी गॅस गोदामांची विशेष पथकामार्फत अचानक तपासणी करावी आणि कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

तसेच, नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातील एलपीजी गॅस पुरवठ्याच्या स्थितीचा आढावा घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते.



या बैठकीस जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी एम. के. चौधरी, बीपीसीएल कंपनीचे राजकुमार मिश्रा यांच्यासह संबंधित गॅस कंपन्यांचे प्रतिनिधी व गॅस वितरक उपस्थित होते.

सध्या जिल्ह्यात एलपीजी गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. ग्राहकांनी गॅस सिलिंडरसाठी ई-केवायसी पूर्ण करून घ्यावी. नियमानुसार गॅस वितरण होत असल्याची खात्री करून घ्यावी. तसेच, गॅसची ऑनलाईन नोंदणी करून अधिकृत पुरवठाधारकांकडूनच गॅस उपलब्ध करून घ्यावा. गॅस वितरणासंदर्भात नागरिकांच्या काही तक्रारी असल्यास भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन १८००२२४३४४, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड १८००-२३३३-५५५, हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड १८००-२३३३-५५५ या टोल फ्री क्रमांकावर अथवा जिल्हाधिकारी कार्यालयातील आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या १०७७ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी केले. गॅस एजन्सींनी गॅस सिलिंडरचा पुरवठा वेळेत व नियमानुसार करावा. वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखावी, तसेच ग्राहकांना वेळेत सेवा मिळेल यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने वितरण करावे. प्रशासनाने गॅस पुरवठा परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवावे, अशा सूचनाही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी दिल्या.

# 'साधं सरळ'मधील विचार आकाशाला गवसणी घालणारे

## ज्ञानेश्वर मंदिरात ज्ञानेश शिंदे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन



**नेवासा**
सार्व मंथन । प्रतिनिधी

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांनी जगाचा वैचारिक दुष्काळ दूर करण्यासाठी ज्ञानेश्वरी ग्रंथाची रचना केली. ज्या पवित्र पावन भूमीत हा महान ग्रंथ रचला गेला, त्याच ठिकाणी ज्ञानेश शिंदे लिखित साधं सरळ या पुस्तकाचे प्रकाशन होणे हा एक सुवर्णयोग आहे. या पुस्तकातील एका वाक्यातील विचार मानवी मनाला उभारी देणारे आणि आकाशाला गवसणी घालणारे आहेत, असे प्रतिपादन वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के यांनी केले.

सोमवार (दि. ९ मार्च) रोजी सकाळी नेवासा येथील श्री ज्ञानेश्वर मंदिरात माऊलींच्या चरणी पुस्तक अर्पण करून हा सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंदिराचे अध्यक्ष व माजी आ. पांडुरंग अभंग होते. यावेळी व्यासपीठावर माजी सभापती सुनीता गडाख, नागेबाबा मल्टीस्टेटचे अध्यक्ष कडूभाऊ काळे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना महंत म्हस्के महाराज म्हणाले की, समाज माध्यमातून चांगले विचार लोकांपर्यंत पोहोचवून हे पुस्तक निराश झालेल्या माणसाला जगण्याचे बळ देईल. अवघड मार्गापेक्षा सरळ आणि सोपा मार्ग लोकांना नेहमीच भावतो, हेच या पुस्तकाचे वैशिष्ट्य असून ते नवीन पिढीला नक्कीच दिशा देईल. अध्यक्षीय भाषणात पांडुरंग अभंग यांनी सांगितले की, माझ्या शेतमळा ते विधानसभा या आत्मचरित्राचे मुखपृष्ठ ज्ञानेश शिंदे यांनीच साकारले होते. त्यांच्या लेखणीत ताकद असून पुस्तकातील वाक्ये थेट काळजाला भिडतात. आजच्या काळात कोणाचेही न ऐकणाऱ्या तरुण पिढीसाठी हे पुस्तक अत्यंत उपयोगी ठरेल.

माजी सभापती सुनीताताई गडाख यांनी ज्ञानेश शिंदे यांच्या साधं सरळ स्वभावाचे कौतुक केले. त्यांच्या याच गुणामुळे विचारांची प्रगती झाली असून हे पुस्तक शाळा, महाविद्यालये आणि देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचायला हवे, अशा शुभेच्छा त्यांनी गडाख परिवारातर्फे दिल्या. लेखक ज्ञानेश शिंदे यांनी यावेळी आपल्या पुस्तकाच्या निर्मितीचा प्रवास उलगडला.

या सोहळ्याला दिनेश व्यवहारे, स्नेहल भुजाडी,कृष्णा मसूरे, मच्छिंद्र व्यवहारे, संजय दळवी, अजित रसाळ, आबासाहेब काळे, नितीन केदारी, जालिंदर गवळी, योगेश रासणे, स्नेहालयच्या डॉ. प्राजक्ता कुलकर्णी, डॉ. शिवाजी शिंदे, अॅड. काकासाहेब गायके, संतोष भामरे यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राहुरी तहसीलसमोर १२ मार्चला वंचित बहुजन आघाडीचा मोर्चा

## ५०-६० वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांना गावठाण ७/१२ उतारा देण्याची मागणी

**राहुरी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

राहुरी तालुक्यात असलेल्या मौजे तांदुळवाडी व राहुरी बु. नवीन गावठाण हद्दीत मागील सुमारे ५० ते ६० वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांच्या जागांची महसुली नोंद करून त्यांच्या नावावर गावठाण ७/१२ उतारा व हक्क नोंद करण्यात यावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात तहसिलदार राहुरी यांना सामूहिक निवेदन देण्यात आले असून, येत्या १२ मार्च रोजी तहसिल कार्यालयासमोर मोर्चा व आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

तांदुळवाडी येथील अनेक कुटुंबे गेल्या अनेक दशकांपासून त्या ठिकाणी स्थायिक असून त्यांनी घरे बांधून कायमस्वरूपी वास्तव्य केले आहे. त्या परिसरात वीज, पाणी यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध असतानाही अद्यापपर्यंत त्या जागांची महसुली नोंद संबंधित नागरिकांच्या नावावर करण्यात



आलेली नाही. त्यामुळे शासकीय घरकुल योजना व इतर शासकीय योजनांचा लाभ घेण्यात नागरिकांना अडचणी येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच तांदुळवाडी गावातील वैदू वस्ती व गोंड वस्ती येथे वास्तव्यास असलेल्या वंचित व कष्टकरी कुटुंबांचीही जागेची नोंद करून त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

यासाठी संबंधित ठिकाणी तात्काळ स्थळ पाहणी करून ग्राममहसूल अधिकारी व मंडळ अधिकाऱ्यांमार्फत पंचनामा व अहवाल सादर करावा, तसेच दीर्घकाळापासून वास्तव्यास असलेल्या पात्र नागरिकांची गावठाण ७/१२ उतारा व हक्क नोंद महसूल अभिलेखात करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

नागरिकांचे स्वतंत्र अर्ज व त्यासोबतचे पुरावे स्वीकारताना प्रत्येक अर्जाला सही-शिक्क्यानिशी पोच देण्यासाठी अतिरिक्त महसूल अधिकारी नेमावेत, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

हे निवेदन वंचित बहुजन आघाडीचे राहुरी तालुकाध्यक्ष बाळासाहेब जाधव यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाध्यक्ष संतोष चोळके यांच्या उपस्थितीत प्रशासनात देण्यात आले. असून, तालुका संपर्क प्रमुख नागेश जाधव तसेच १२ मार्च रोजी तहसिल कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती बाळासाहेब जाधव यांनी दिली असून यावेळी निवेदनावर अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# कोल्हार भगवतीपूरमध्ये इफ्तार पार्टीतून एकोप्याचा संदेश

## रमजाननिमित्त व्यापारी असोसिएशनचा पुढाकार

**कोल्हार**
सार्व मंथन । प्रतिनिधी

पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर येथील मुस्लिम बांधवांच्या उपवासाच्या निमित्ताने कोल्हार भगवतीपुर व्यापारी असोसिएशनच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले. सोमवार (दि. ९ मार्च) रोजी सायंकाळी ६.३० वाजता कोल्हार येथील मशिदीत हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमातून समाजात बंधुभाव, प्रेम आणि एकोपा वृद्धिंगत करण्याचा सुंदर संदेश देण्यात आला.

रमजान महिना हा मुस्लिम समाजासाठी अत्यंत पवित्र मानला जातो. या महिन्यात मुस्लिम बांधव सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत रोजा (उपवास) पाळतात. संयम, त्याग, प्रार्थना आणि दानधर्म यांना या महिन्यात विशेष महत्त्व असते. दिवसभराच्या उपवासानंतर सूर्यास्ताच्या वेळी सामूहिकरीत्या घेतला जाणारा इफ्तार हा केवळ धार्मिक विधी नसून समाजातील एकता, बंधुभाव आणि परस्पर प्रेम वाढवण्याचा एक सुंदर प्रसंग असतो.

यावेळी मार्गदर्शन करताना कोल्हार बु. चे माजी सरपंच अॅड. सुरेंद्र खर्डे म्हणाले की, सध्या जगभरात युद्धसदृश परिस्थिती निर्माण झालेली दिसून येत आहे. अशा वेळी काही राजकीय शक्ती या परिस्थितीचा फायदा घेत समाजात मतभेद निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून येते. सोशल मीडियावर अनेक अफवा पसरत असून विविध प्रकारचे संदेश व्हायरल होत आहेत. त्यामुळे नागरिकांनी अशा अफवांवर विश्वास न ठेवता समाजातील बंधुभाव आणि एकोप्याला अधिक बळ देणे आवश्यक आहे.

ते पुढे म्हणाले की, कोल्हार भगवतीपुरमध्ये पूर्वीप्रमाणे शांतता, सलोखा आणि परस्पर प्रेम कायम राहावे यासाठी व्यापारी असोसिएशनने इफ्तार पार्टीचे आयोजन करून सकारात्मक पाऊल उचलले आहे. या उपक्रमामुळे दोन्ही समाजांमध्ये परस्पर स्नेह व सद्भावना अधिक दृढ होईल. कोल्हारला पुन्हा एकदा गतवैभव प्राप्त व्हावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. तसेच सर्व मुस्लिम बांधवांना रमजान रोजाच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या.



दरम्यान, या कार्यक्रमात मुस्लिम बांधवांच्या वतीने अॅड. सुरेंद्र खर्डे, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष अजित मोरे, उपाध्यक्ष अतुल रांका, तसेच संजय शिंगवी व ज्ञानेश्वर खर्डे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी कोल्हार बुद्रुकचे माजी सरपंच अॅड. सुरेंद्र खर्डे, कोल्हार भगवतीपुर व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष अजित मोरे, उपाध्यक्ष अतुल रांका, पद्मश्री विखे कारखान्याचे संचालक ज्ञानेश्वर खर्डे, कोल्हार भगवतीपुर व्यापारी पतसंस्थेचे चेअरमन संजय शिंगवी, व्यापारी असोसिएशनचे सचिव महेश फलटणे, आप्पा राजभोज, पत्रकार गणेश सोमवंशी, रोहित देडगावकर, किशोर गंभीर, विनीत हिरानंदानी, दीपक डंक, निलेश मोहाडकर, महेश राजभोज, समीर शेख, हमीद शेख, वसीम तांबोळी, आदिल सय्यद, आसिफ शेख, अकबर शेख, माजीद शेख, परवेज शेख, बिलाल मन्सुरी, शाहरुख शेख आदी उपस्थित होते.

# कडीतच्या उपसरपंचपदी प्रा. होन

## शैक्षणिक क्षेत्रातून कौतुकाचा वर्षाव

**मानोरी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

कडीत ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी अष्टविनायक इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेजचे प्राध्यापक प्रा. ईश्वर होन यांची निवड झाली आहे. त्यांच्या निवडीबद्दल शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातून त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

प्रा. ईश्वर होन हे अष्टविनायक इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत असून, शिक्षणासोबतच सामाजिक कार्यातही त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. गावाच्या विकासासाठी तरुण नेतृत्वाची गरज ओळखून ग्रामस्थांनी त्यांच्यावर विश्वास दाखवत उपसरपंचपदाची जबाबदारी सोपवली आहे.



अष्टविनायक इंग्लिश मीडियम स्कूलचे प्राचार्य मोहिनीराज होन यांनी प्रा. ईश्वर होन यांच्या निवडीबद्दल आनंद व्यक्त करत, त्यांच्या नेतृत्वामुळे शैक्षणिक क्षेत्रासोबतच सामाजिक व ग्रामीण विकासाच्या कामांना नवे बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

प्रा. ईश्वर होन तसेच त्यांचे बंधू प्रा. योगेश होन हे दोघेही अभ्यासू व कर्तव्यदक्ष प्राध्यापक म्हणून परिसरात ओळखले जातात. त्यांच्या निवडीमुळे कडीत गावाच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

दरम्यान, अष्टविनायक इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेजच्या वतीने प्रा. ईश्वर होन यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य मोहिनीराज होन व इतर शिक्षकांनी त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# सोनईत महिला दिनानिमित्त मोफत आरोग्य शिबीर

**अहिल्यानगर**
सार्व मंथन । प्रतिनिधी

माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली व शारदाताई फॉउंडेशन आयोजित सोनई येथे आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने सर्वसाधारण आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरास सोनई परिसरातील महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दाखवला होता. विशेषत: महिलांची उपस्थिती लक्षणीय असल्याचे दिसून आले. या आरोग्य शिबिरात अहिल्यानगर येथील नामवंत तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत दंत, मुखरोग, मासिक पाळी समस्या, रक्तदाब, मधुमेह, कान-नाक-घसा तपासणी, डोळ्यांची तपासणी तसेच महिलांची शरीर तपासणी करण्यात आली.

यावेळी सोनई व परिसरातील महिला भगिनींची हजारोंच्या संख्येने उत्स्फूर्त उपस्थिती होती. यावेळी सर्व महिला भगिनींनीं एकत्र भोजनाचा आनंद घेतला.

# आदिवासी उपयोजनेअंतर्गत लाभार्थी आदिवासी शेतकऱ्यांना चारापिके बियाणे व कृषी निविष्ठा वाटप कार्यक्रम उत्साहात

**राहुरी विद्यापीठ**
सार्व मंथन । प्रतिनिधी

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या अखिल भारतीय समन्वित चारापिके संशोधन प्रकल्प विभागाच्या आदिवासी उपयोजना अंतर्गत प्राप्त आनुदानातून मौजे पालीपाडा, ता. नवापूर, जि.नंदूरबार येथील आदिवासी शेतकऱ्यांना रब्बी हंगामात ओट व बरसीम या चारापिके बियाण्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये पीक वाढीनंतर आवश्यक असणारे मनुष्यचलित सायकल कोळपे, सुक्ष्म अन्नद्रव्ये, मेटॅऱ्हायझिअम, कृषिदर्शनी व दुष्काळी व कमी पाण्याची आवश्यकता असणारे काटे विहरीत निवडूंग (कॅक्टस) पाने व नेपीअर ठोंबे या कृषि निविष्ठांचा समावेश होता.

महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांचे मार्गदर्शनाखाली संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुरेश दोडके, चारा पैदासकार डॉ. लक्ष्मण तागड यांच्या नियोजनाखाली या योजनेतील शास्त्रज्ञ डॉ. योगेश सैदाणे, डॉ. संदिप लांडगे, कनिष्ठ संशोधन सहाय्यक दिपक पालवे, कृषि सहाय्यक सुहास भालेराव व कृषि विज्ञान केंद्र, नंदूरबार येथील शास्त्रज्ञ व समन्वयक योगेश पाडवी यांच्या उपस्थितीत विविध निविष्ठांचे ३० लाभार्थी आदिवासी शेतकऱ्यांना



वाटप करण्यात आले. या कार्यक्रम ासाठी या योजनेतील अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. या प्रसंगी पालीपाडा व श्रावणी गावचे सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य, पोलिस पाटील तसेच प्रगतशिल शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




सायं. दैनिक
# सार्वं मंथन
नवी दिशा, नवी आशा
मंगळवार, दि. १० मार्च २०२६ पान ०४



२० फेब्रुवारी २५

## मंथन फटकारे

अनुसंगम तथा बाळासाहेब शिंदे
मो. ९५०३९५९९५७

घरगुती, व्यावसायिक गॅस महागला–वृत्त

**– 'धीरे–धीरे, सबके साथ, सबका विकास? सुरु झाला वाटतं? हळू–हळू 'झटके' सुरु झालेत**

विश्वास पाटील धूर्त व कपटी–शिर्के

**– निदान स्वतःच्या नावाप्रमांणे समाजाचा 'विश्वास' त्यांनी जोपासायला हवा! सत्तेपुढे 'लाचार' झाले की काय?**

नितीशकुमार(७५), शरद पवार(८५), देवेगौडा(९२)हे तरुण राज्यसभेत–वृत्त

**– 'सत्तेची ऊब' काही केल्या कमी होत नाही!केंद्र,राज्य कर्मचाऱ्यांसारखी सेवानिवृत्त वयोमर्यादा राजकारण्यांना आवश्यक होईल का?**

राहुरी नगराध्यक्ष मोरेंचा कामाचा धडाका–वृत्त

**– जनतेलाही आनंद होतोय! शिक्षित उमेदवार निवडून दिल्याचा जनतेला नक्कीच फायदा होईल! फक्त हा कामाचा धडाका पाच वर्षे (विना अडथळा) सुरु राहिला पाहिजे!**

प्रभारी पोलीस निरीक्षकाकडून मढीत धुडगूस–वृत्त

**– प्रभारी काळातील बंदोबस्ताचा सराव करीत असेल? जिल्हा पोलीस अधीक्षक लक्ष घालतील?**

अहिल्यानगर महापालीकेत 'लेट लतीफ' कर्मचाऱ्यांवर बडगा?–वृत्त

**– अनेक वर्षे प्रशासक असल्याने विचारणारे कोणी नव्हते! प्रत्येक पालिकेने कर्मचाऱ्यांना 'कामाची' वेळ सांगितली तर बरे होईल!काही जण तर स्वतःच्या कामावर दुसऱ्यांनाच पाठवितात?**

### राहुरीत बुवासिंद बाबा

# समाधीवरील भगवे वस्त्र जाळल्याचा प्रकार

## सखोल चौकशीची सकल हिंदू समाजाची मागणी

**राहुरी**
**सार्व मंथन । शहर प्रतिनिधी**

राहुरी शहरातील श्री बुवासिद्ध देव महाराज यांच्या समाधीस्थळी भगवे वस्त्र जाळल्याचा प्रकार घडल्याने शहरात संतापाची भावना व्यक्त होत असून या घटनेची सखोल चौकशी करून गुन्हा दाखल करण्याची मागणी सकल हिंदू समाजाकडून करण्यात आली आहे. याबाबत तहसीलदार तसेच राहुरी पोलीस स्टेशन येथे निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनानुसार, दिनांक ६ मार्च २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या दिवशी दुपारी सुमारे १.४५ वाजण्याच्या सुमारास श्री बुवासिद्ध देव महाराज यांच्या समाधीवरील भगवे वस्त्र एका अल्पवयीन मुलाने पेटवून दिल्याचा प्रकार घडला. या घटनेमुळे हिंदू समाजाच्या भावना दुखावल्या असल्याचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

त्या दिवशी शहरात छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक निघणार होती. अशा परिस्थितीत ही घटना शहरात पसरली असती तर दंगलसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता होती. मात्र हिंदू समाजाच्या कार्यकर्त्यांनी संयमाने परिस्थिती हाताळल्याचे निवेदनात सांगण्यात आले आहे.

दरम्यान, या घटनेत एक अल्पवयीन मुस्लिम मुलगा सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दिसत असल्याचा दावा करण्यात आला असून त्याची चौकशी करून त्यामागील मुख्य सूत्रधार कोण आहे याचा शोध घेण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच मंदिर परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेज तपासून त्या वेळी परिसरात उपस्थित असलेल्या व्यक्तींची चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली आहे.



गेल्या वर्षी याच काळात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची विटंबना झाल्याची घटना घडली होती आणि त्या प्रकरणातील आरोपी अद्याप सापडलेला नसल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे या घटनेची गांभीर्याने चौकशी करून संबंधितांवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी सकल हिंदू समाजाकडून करण्यात आली आहे.

तसेच भविष्यात अशा घटना घडल्यास सामाजिक तेढ निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी प्रशासनावर राहील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

# राहुरीत पोलिसावर लोखंडी गज–दांडक्याने हल्ला

## व्हिडिओ शूटिंगचा राग मनात धरून मारहाण

## पोलिसाचा मोबाईलही हिसकावला ▶ १२ ते १५ जणांविरुद्ध गुन्हा

**राहुरी**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

कंटेनरलाधक्कालागल्याच्या वादातून जमलेल्या जमावाने पोलिसावरच लोखंडी गज व दांडक्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना राहुरी येथे घडली. या प्रकरणी १२ ते १५ जणांविरुद्ध राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, राहुरी पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस हेड कॉन्स्टेबल विकास रंगनाथ वैराळ हे मुळानगर बिटाचे कामकाज पाहतात. ८ मार्च रोजी मुळा धरणात एका मुलाचा बुडून मृत्यू झाल्याने ते घटनास्थळी भेट देऊन परत येत होते. सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास महात्मा फुले कृषी विद्यापीठाजवळील डिग्रस फाटा येथे काही इसम कंटेनर चालकाला मारहाण करण्याच्या तयारीत असल्याचे त्यांनी पाहिले.

या वेळी वैराळ यांनी स्वतः पोलीस असल्याचे सांगून त्यांना समज देण्याचा प्रयत्न केला तसेच घटनेचे मोबाईलवर व्हिडिओ चित्रीकरण करण्यास सुरुवात केली. मात्र जमावातील काही इसम दारूच्या नशेत असून त्यांनी पोलिसांबद्दल अपशब्द वापरत अरेरावी केली.

यानंतर नगर मनमाड रोड पाणी टाकी जवळ रात्री सुमारे ११.४५ वाजता ग्रीन हॉटेल चौक येथे वाहतूक कोंडी सोडवित असताना याच प्रकरणातील काही इसम पुन्हा स्कॉर्पिओ व स्विफ्ट कारमधून आले. त्यांनी वैराळ यांच्यावर लोखंडी गज, फायटर व लाकडी दांडक्याने हल्ला करून बेदम मारहाण केली. तसेच गळा दाबून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. या मारहाणीत वैराळ जखमी झाले असून त्यांच्या नाकातून रक्तस्राव झाला.

या वेळी इतर पोलिसांनी मध्यस्थी करून त्यांची सुटका केली. दरम्यान, मारहाणीच्या वेळी महेश निमसे याने वैराळ यांच्या खिशातील वन प्लस कंपनीचा मोबाईल जबरदस्तीने हिसकावून नेल्याचीही तक्रार करण्यात आली आहे.

या घटनेनंतर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत खंडू वसंत काळे, वैभव बाबासाहेब तारडे, संतोष अंकुश काळे (सर्व रा. बुरुडगाव, ता. जि. अहिल्यानगर) या तिघांना ताब्यात घेतले असून इतर आरोपींचा शोध सुरू आहे. जखमी पोलीस कर्मचारी विकास वैराळ यांच्यावर सिव्हील हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे उपचार सुरू आहेत. राहुरी पोलिस ठाण्यात या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.



# 'महाराजस्व' शिबिराने कारेगावकरांचे 'समाधान'

**श्रीरामपूर**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या 'गतिमान प्रशासन' मोहिमेंतर्गत कारेगाव येथे शनिवारी (दि. ७) 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' उत्साहात पार पडले. विविध शासकीय विभागांच्या सहभागामुळे नागरिकांची अनेक प्रलंबित कामे एकाच ठिकाणी मार्गी लागली.

शिबिराचे उद्घाटन पंचायत समितीचे माजी सभापती दीपक पटारे व तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. शिबिरात महसूल, पुरवठा, आरोग्य तसेच सेतू सुविधा केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना तात्काळ सेवा देण्यात आल्या. पुरवठा विभागामार्फत ३२ नागरिकांना नवीन व दुबार शिधापत्रिकांचे वितरण करण्यात आले. सेतू सुविधा केंद्रातून १४३ उत्पन्न दाखले, १५ राष्ट्रीयत्व दाखले, ३६ रहिवासी दाखले देण्यात आले तसेच २५ नागरिकांची आधार नोंदणी व दुरुस्ती करण्यात आली.

प्रास्ताविक तहसीलदार वाघ यांनी केले, तर नायब तहसीलदार दत्तात्रय शेकटकर यांनी आभार मानले. शिबिराच्या आयोजनासाठी पुरवठा निरीक्षक राजेंद्र शिंदे, प्र. निवासी नायब तहसीलदार अभया राजवाळ, मंडळ अधिकारी भाग्यश्री शिंदे, सहायक महसूल अधिकारी उमेश मुतगेकर, इंजिनियर राजेश कवाने, तलाठी ऋषिकेश कदम, रमाकांत हरेर, राहुल साठे, महसूल सेवक यांनी परिश्रम घेतले.

# महाराजस्व
## अभियान उत्साहात

सार्व मंथन ✍ शिर्डी । राहाता तालुक्यातील बाभळेश्वर मंडळात महसूल प्रशासन व विविध विभागांच्या संयुक्त विद्यमाने 'महाराजस्व अभियान' तसेच 'छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबीर (टप्पा क्र. १)' उत्साहात पार पडले. या शिबिराच्या माध्यमातून परिसरातील शेकडो नागरिकांना एकाच ठिकाणी विविध शासकीय सेवा व दाखल्यांचे थेट वाटप करण्यात आले. हे शिबिर माजी अध्यक्षा शालिनीताई विखे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

# गाडे कुटुंबावरील हल्लेखोरांना तात्काळ अटक करा

## चर्मकार समाजाच्यावतीने राहुरी पोलिसांना निवेदन

**राहुरी**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील दौलवडगाव येथील रहिवासी असलेले गोपीनाथ गाडे महाराज यांचा घरावर काही समाजकंटकांनी हल्ला करत त्यांचे राहते घर, संत रोहिदास महाराज अध्यायन केंद्र व चप्पलचे दुकानाला पेटवून दिले सदर घटनेचा निषेध व्यक्त करत आरोपींना तात्काळ अटक



करून पीडित कुटुंबाला संरक्षण देण्याचे विषयी राहुरी पोलीस स्टेशनला चर्मकार समाजाच्या वतीने निवेदन देण्यात आले.

२५ फेब्रुवारी २०२६ रात्रीच्या वेळेला दौलवडगाव येथील रहिवासी असलेले गोपीनाथ गाडे महाराज यांची गावातील काही समाजकंटकाबरोबर काही दिवसापुर्वी वाद झाले होते या वादातून गाडे यांच्या घरावर हल्ला करत त्यांचे राहते घर संत रोहिदास महाराज अध्ययन केंद्र व चप्पल चे दुकानाला पेटवून दिले याप्रकरणी तेथील पोलीस स्टेशनला आरोपीं विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून घटनेतील आरोपींना अद्याप अटक झालेली नाही.

सदर घटनेतील आरोपींना तात्काळ अटक करून गाडे कुटुंबीयांना पोलीस संरक्षण देऊन शासनाने आर्थिक मदत करावी यासाठी राहुरी पोलिसांना चर्मकार समाजाच्या वतीने निवेदन देण्यात आले याप्रसंगी चर्मकार विकास संघ जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल देवरे, चर्मकार विकास संघ तालुकाध्यक्ष किरण घनदाट ,चर्मकार विकास संघ राहुरी तालुका महिला आघाडी अध्यक्ष सुरेखाताई देवरे, दिलीप अभंग चर्मकार विकास संघ श्रीरामपूर तालुका अध्यक्ष, बाळासाहेब कांबळे, बाळकृष्ण वाघ, भीमा तेलोरे, राजेंद्र देशमुख, पोपट वाघ, नवनाथ कदम आदी उपस्थित होते.

# उन्हाळी हंगामासाठी पाणी मागणीचे अर्ज २४ मार्चपर्यंत सादर करा

**अहिल्यानगर**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

नाशिक पाटबंधारे विभागाच्या कार्यक्षेत्रातील विविध धरणे व कालव्यांमधून उन्हाळी हंगाम सन २०२५–२६ साठी उभी हंगामी चारा पिके, ऊस व फळबागांसारख्या बारमाही पिकांना पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

या पाण्याचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या लाभधारक शेतकऱ्यांनी व पाणी वापर संस्थांनी नमुना क्रमांक ७ वरील अर्ज संबंधित सिंचन शाखा कार्यालयात दि. २४ मार्च २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत, असे आवाहन नाशिक पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता सो. अ. शहाणे यांनी केले आहे. निर्धारित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.


याशिवाय दारणा, गंगापूर, मुकणे, भावली, वाकी, भाम, कडवा, वालदेवी, गौतमी–गोदावरी, काश्यपी व आळंदी आदी धरणांच्या जलाशयांवरून; तसेच दारणा, गोदावरी, कडवा व आळंदी नद्यांच्या पात्रातून आणि गोदावरी नदीवरील विभागाच्या अधिपत्याखालील एकूण १० कोल्हापुरी बंधाऱ्यांच्या ठिकाणावरून प्रवाही व उपसा सिंचनाद्वारे हे पाणी दिले जाईल.

धरणांमधील उपलब्ध पाण्यातून प्रथम पिण्याच्या पाण्याची गरज भागवली जाईल आणि उर्वरित पाण्यातून शेतीसाठी कालव्यांच्या आवर्तनानुसार पाणीपुरवठा करण्यात येईल. त्यामुळे शेतकऱ्यांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा तसेच ठिबक व तुषार यांसारख्या सूक्ष्म सिंचन पद्धतींचा अधिकाधिक वापर करावा, असे आवाहनही विभागाने केले आहे.

# हरिजनवस्ती प्रभाग २ अंधारातच

## लाईटपोलवर वीज जोडणीसाठी पालिकेची टाळाटाळ

### नगरसेवकांची आश्वासने कचऱ्याच्या डब्यात; सचिन दिनकर यांचा प्रशासनावर हल्लाबोल!



**पाथर्डी**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

निवडणुकीपूर्वी गल्लीबोळात फिरून विकासाची मोठी स्वप्ने दाखवणारे लोकप्रतिनिधी नगरसेवक होताच जनतेला पूर्णपणे विसरले असून, हरिजनवस्ती प्र. क्र. २ मधील परिस्थिती सध्या अत्यंत भयावह झाली आहे. ही वस्ती पूर्णपणे अंधारात आणि धुळीच्या विळख्यात सापडली असून, वारंवार पाठपुरावा करूनही नगरपरिषद प्रशासनाकडून लाईटपोलवर वीज जोडणी करण्यासाठी केवळ टाळाटाळ केली जात आहे. विशेष म्हणजे, यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते सचिन दिनकर यांनी प्रशासकीय स्तरावर अनेकदा लेखी अर्ज देऊन आणि विनंती करूनही त्याची साधी दखलही घेतली जात नसल्याने, लोकप्रतिनिधी आणि नगरपरिषद प्रशासनाच्या विरोधात नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

शासनाकडून मागासवर्गीय आणि हरिजन वस्त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दरवर्षी लाखो–करोडो रुपयांचा विशेष निधी उपलब्ध करून दिला जातो. कागदोपत्री या निधीतून वस्तीचा कायापालट झाल्याचे दावे केले जात असले, तरी प्रत्यक्षात मात्र येथील रहिवाशांना त्याचा कोणताही लाभ मिळत नसल्याचे विदारक चित्र आहे. ''आमच्या वॉर्डाच्या नावाने निधी येतो, मग तो खर्च कुठे होतो? जर वस्तीत साधे दिवे लागत नसतील आणि धुळीचे साम्राज्य पसरले असेल, तर हा निधी नक्की कोणाच्या खिशात जातो?'' असा जळजळीत प्रश्न सामाजिक कार्यकर्ते सचिन दिनकर यांनी उपस्थित केला आहे. वस्तीत उभे केलेले लाईटपोल सध्या केवळ शोभेच्या वस्तू बनले असून, रात्रीच्या वेळी संपूर्ण परिसर अंधारात बुडलेला असतो, ज्यामुळे सुरक्षा पूर्णपणे रामभरोसे आहे.

सर्वात मोठी शोकांतिका म्हणजे, मतदानाच्या आधी आणि नगरसेवक पद मिळवण्यापूर्वी ज्यांनी ''प्रभाग चकाचक करू'' अशी वचने दिली होती, त्या नगरसेवकांची आश्वासने आता कचऱ्याच्या डब्यात गेली आहेत. सत्ता मिळताच वस्तीतील नागरिकांना वाऱ्यावर सोडणाऱ्या या लोकप्रतिनिधींबाबत ''आमची मते फक्त तुमच्या राजकारणासाठी होती का?'' असा संतप्त सवाल रहिवासी विचारत आहेत. रस्त्यांची दुरवस्था आणि धुळीमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. जर तातडीने वीज जोडणी करून धुळीचा प्रश्न मार्गी लावला नाही, तर नगरपरिषदेवर धडक मोर्चा काढत तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सचिन दिनकर व वस्तीतील संतप्त नागरिकांनी दिला आहे.

# लग्नाच्या वरातीत डीजेचा दणदणाट, नवरदेवासह चालकावर गुन्हा दाखल

**अहिल्यानगर**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

शहरातील बोल्हेगाव परिसरात रात्रीच्या वेळी नियमांची पायमल्ली करून डीजे चा दणदणाट करणे नवरदेवासह चालकाला अंगलट आले आहे. जिल्हादंडाधिकारी यांचे आदेश झुगारून वरात काढल्याप्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात पहिल्यांदाच थेट नवरदेवासह डीजे चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस नाईक रवींद्र तुकाराम धुंगासे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ७ मार्च रोजी रात्री बोल्हेगाव येथील आंबेडकर चौकात नवरदेव सोनु उर्फ संदेश राजेंद्र गायकवाड याची वरात निघाली होती. यावेळी मर्यादेपेक्षा मोठ्या आवाजात डीजे सुरू असल्याने ध्वनी प्रदूषणाचे नियम धाब्यावर बसवले गेले. गस्त घालणाऱ्या पोलिस पथकाने डीजे बंद करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, नवरदेव सोनु उर्फ संदेश राजेंद्र गायकवाड (रा. रेणुकानगर, बोल्हेगाव) आणि डीजे चालक गणेश बाळासाहेब कोलते (रा. बोल्हेगाव) यांनी पोलिसांच्या सूचनेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले.

ध्वनी तीव्रता मोजमाप यंत्राद्वारे तपासणी केली असता आवाजाची पातळी ८२.४ डेसिबल इतकी आढळून आली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे आणि जिल्हादंडाधिकारी यांच्या प्रतिबंधात्मक आदेशांचे उल्लंघन केल्याप्रकरणी संबंधित दोघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता व पर्यावरण संरक्षण कायद्यान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

सायं. दैनिक सार्वं मंथन नवी दिशा, नवी आशा

हे पत्रक मुद्रक, मालक, प्रकाशक **अनिल गंगाधर कोळसे** यांनी यांच्या **स्वराज प्रेस ॲण्ड प्रिंटींग येथे ५९३, राहुरी बु।, ता. राहुरी, जि. अहमदनगर (महा) येथे छापून कोळसे दुबीचा मळा, व्यंकोबा मंदीर परिसर, राहुरी, ता. राहुरी, जि. अहमदनगर ४१३ ७०५, (महा.)** येथे प्रकाशित केले. संपादक अनिल गंगाधर कोळसे सदर अंकात प्रकाशित झालेल्या लेख बातम्यांच्या मजकूराशी संपादक सहमत असेलच असे नाही. न्यायालयीन वाद–विवाद राहुरी न्याय कक्षेअंतर्गत (खाजगी वितरणासाठी) मुद्रणीय दोष संभवणीय.
RNI No. MAHMAR/2016/72596